# बीसवीं शताब्दी - संघर्षमय विसावे शतक

## अ. पहिले महायुदध

**खलील प्रशनंची उत्तरे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा**

### संघर्षाचे युग

**१. पहिल्या महायुद्धाची कारणे द्या.**

**उत्तर:** पहिल्या महायुद्धाची कारणे पुढीलप्रमाणे:

- i. युरोपियन राष्ट्रांचा साम्राज्यवाद
- ii. आक्रमक राष्ट्रवाद
- iii. लष्करवाद
- iv. राजनैतिक गटबाजी
- v. युरोपीय राष्ट्रांची दोन गटांत विभागणी
- vi. बाल्कन प्रदेशातील राजकीय गुंतागुंत
- vii. ऑस्ट्रियाचा युवराज आर्चड्युक फ्रान्सिस फर्डिनांड याची हत्या.

### युरोपीय राष्ट्रांचा साम्राज्यवाद

**२. युरोपियन राष्ट्रांनी युरोपबाहेर बाजारपेठा शोधण्याचा का प्रयत्न केला?**

**उत्तर:** औद्योगिकीकरणामुळे युरोपियन राष्ट्रांना आपल्या उत्पादनासाठी कच्चा माल व बाजारपेठ यांची आवश्यकता भासू लागली; म्हणूनच युरोपियन राष्ट्रांनी युरोपबाहेर बाजारपेठा शोधण्याचा प्रयत्न केला.

**३. युरोपीय राष्ट्रांमधील शत्रुत्व विकोपाला का गेले होते?**

**उत्तर:** साम्राज्यवाद विस्ताराच्या गळे-कापू स्पर्धेमुळे युरोपीय राष्ट्रांमध्ये शत्रुत्व निर्माण झाले होते जे आशिया व आफ्रिका खंडांचे आर्थिक महत्त्व लक्षात आल्याने विकोपाला गेले होते.

## आक्रमक राष्ट्रवाद

४. *आक्रमक राष्ट्रवाद म्हणजे काय ते स्पष्ट करा.

किंवा

आक्रमक राष्ट्रवाद म्हणजे काय? [जुलै १५]

उत्तर: i. आपलेच राष्ट्र आणि राष्ट्रीय परंपरा या सर्वश्रेष्ठ असून अन्य राष्ट्रे कमी दर्जाची आहेत, अशी श्रेष्ठत्वाची भावना बाळगणे.

ii. आपल्या राष्ट्रावर प्रेम म्हणजे दुसऱ्या राष्ट्राचा विशेषत: शत्रू राष्ट्राचा द्वेष ही भावना बळावून, विस्तारवादी धोरण स्वीकारणे म्हणजे आक्रमक राष्ट्रवाद होय.

iii. युरोपियन राष्ट्रांनी आक्रमक राष्ट्रवादाचा अंगीकार करत आशिया व आफ्रिका खंडांत वसाहती स्थापन केल्या.

iv. आक्रमक राष्ट्रवादामुळे आंतरराष्ट्रीय कलह निर्माण झाले.

## लष्करवाद

*५. युरोपीय राष्ट्रांनी शस्त्रसज्जता का वाढविली?

उत्तर: i. युरोपियन राष्ट्रांनी शांतता व सुरक्षिततेकरिता शस्त्रसज्जता वाढविली.

ii. आपले प्रश्न सोडविण्याचा युद्ध हाच एकमेव मार्ग आहे अशी त्यांची धारणा होती.

***६. बिस्मार्कच्या परराष्ट्रीय धोरणाविषयी माहिती लिहा.**

**[मार्च १५]**

**उत्तर:** i. १८६६ साली जर्मनीने ऑस्ट्रियाचा व १८७० मध्ये फ्रान्सचा पराभव केला.

ii. १८७१ च्या फ्रँकफोर्टच्या तहानुसार जर्मनीने फ्रान्सचे आल्सेस व लॉरेन हे प्रदेश बळकावले. यानंतर बिस्मार्कने फ्रान्सला एकाकी पाडले.

iii. इंग्लंड व फ्रान्स यांच्यात परंपरागत वैर होते. त्यामुळे ही शत्रू राष्ट्रे एकत्र येऊ नयेत याची बिस्मार्कने दक्षता बाळगली.

iv. इटली आणि फ्रान्स यांच्यातील धार्मिक व वसाहतविषयक वैमनस्याचा फायदा घेऊन बिस्मार्कने इटलीला आपल्या गटात सामील करून घेतले.

v. १८८२ मध्ये जर्मनी – ऑस्ट्रिया – इटली यांच्यात त्रिराष्ट्र मैत्री करार झाला.

**७. पूर्वेकडील इंग्लंडच्या व्यापाराला शह देण्यासाठी कैसर विल्यम दुसरा याने काय केले?**

**उत्तर:** पूर्वेकडील इंग्लंडच्या व्यापाराला शह देण्यासाठी कैसर विल्यम दुसरा याने तुर्कस्तानकडून बर्लिन ते बगदाद व तेथून पुढे इराणच्या आखातापर्यंत रेल्वे मार्ग बांधण्याचे अधिकार मिळविले.

***८. इंग्लंड व जर्मनी या दोन राष्ट्रांत संघर्ष का वाढला?**

**उत्तर:** i. १८८८ मध्ये कैसर विल्यम दुसरा, जर्मनीचा सम्राट बनला. त्याने नाविक सैन्य व तळ विकसित केले, तसेच आक्रमक वसाहतवादाचे धोरण अंगिकारले.

ii. पूर्वेकडील इंग्लंडच्या व्यापाराला शह देण्यासाठी कैसर विल्यम दुसरा याने तुर्कस्तानकडून बर्लिन ते बगदाद व तेथून पुढे इराणच्या आखातापर्यंत रेल्वे मार्ग बांधण्याचे अधिकार मिळविले.

iii. इंग्लंड, फ्रान्स व रशिया या राष्ट्रांनी तीव्र विरोध केल्यामुळे हा रेल्वे मार्ग पूर्ण करणे त्याला शक्य झाले नाही.

iv. कैसर विल्यम दुसरा याने कील कालव्याची पुनर्बांधणी व दुरुस्ती केल्यामुळे जर्मन युद्धनौकांना उत्तर समुद्रात प्रवेश करणे सहज शक्य झाले.

अशा प्रकारे, कैसर विल्यम दुसरा याच्या वसाहतवाद व आरमार वाढीबाबतच्या महत्त्वाकांक्षेतून इंग्लंड व जर्मनी या दोन राष्ट्रांमधील संघर्ष वाढत गेला.

## युरोपीय राष्ट्रांची दोन गटांत विभागणी

**१. इंग्लंड आणि फ्रान्समधील अनेक वर्षांचे वैमनस्य कसे संपुष्टात आले?**

**उत्तर:** i. जर्मनीच्या विस्तारवादी भूमिकेमुळे फ्रान्सला आपला मित्रगट उभा करण्याची गरज भासू लागली.

ii. कैसर विल्यम दुसरा याच्या आक्रमक धोरणांमुळे इंग्लंड व जर्मनी या दोन राष्ट्रांमधील संघर्ष वाढत गेला.

अशा प्रकारे, इंग्लंड आणि फ्रान्स खरेतर जुने परंपरागत शत्रू होते; परंतु १९०४ साली त्यांच्यात करार होऊन अनेक वर्षांचे वैमनस्य संपुष्टात आले.

**१०. युरोपियन राष्ट्रांनी बाल्कनच्या प्रदेशात हस्तक्षेप करण्यास का सुरुवात केली?**

**उत्तर:** i. तुर्कस्तानच्या साम्राज्यात मोडणारा पूर्व युरोपचा प्रदेश हा 'बाल्कनचा प्रदेश' म्हणून ओळखला जात असे.

ii. या प्रदेशावर ज्या राष्ट्राचे वर्चस्व असेल त्यास भूमध्य समुद्र आणि तेथून आशियास जाणारा मार्ग यावर नियंत्रण ठेवणे शक्य होते; म्हणूनच भौगोलिकदृष्ट्या हा प्रदेश महत्त्वाचा होता.

iii. अशा प्रकारे, अनेक युरोपियन राष्ट्रांनी बाल्कनच्या प्रदेशात हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली.

**११. ऑस्ट्रियास बाल्कनच्या प्रदेशात स्वारस्य का होते?**

**उत्तर:** ऑस्ट्रिया- हंगेरी राज्याची सीमा बाल्कन प्रदेशाला लागून होती आणि साम्राज्य विस्तारासाठी ऑस्ट्रियाला बाल्कन प्रदेश सोयीचा होता; म्हणून ऑस्ट्रियास बाल्कनच्या प्रदेशात स्वारस्य होते..

## महायुद्धाचे तत्कालीन कारण

**१२. पहिल्या महायुद्धाचे तत्कालीन कारण काय होते?**

**उत्तर:** २८ जून १९१४ रोजी बोस्नियाची राजधानी सॅराजेव्हो येथे ऑस्ट्रियाचा युवराज आर्चड्युक फ्रान्सिस फर्डिनांड यांची एका जहाल सर्बियन नागरिकाने हत्या केली. हे पहिल्या महायुद्धाचे तत्कालीन कारण होते.

## पहिल्या महायुद्धाची वाटचाल

**१३. पहिल्या महायुद्धाला कलाटणी देणारा इतिहासातील घटक कोणता?**

**उत्तर:** अमेरिकेने युद्धात भाग घेतल्यानंतर दोस्त राष्ट्रांची बाजू मजबूत झाली. हाच पहिल्या महायुद्धाला कलाटणी देणारा घटक होय.

## प्र.३. खालील विधानांची कारणे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा.

### संघर्षाचे युग

***१. युरोपातील वातावरण स्फोटक बनले.** **[मार्च १६]**

**उत्तर:** i. २० व्या शतकात युरोपीय राष्ट्रांमध्ये साम्राज्य उभारणीसाठी मोठी स्पर्धा सुरू झाली व त्यामुळे अनेक सशस्त्र संघर्ष सुरू झाले.

ii. संहारक हत्यारे, शस्त्रास्त्रे, रणगाडे, युद्धनौका, यांत्रिक बंदुका, विध्वंसक स्फोटके यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला गेला.

iii. अनेक राष्ट्रांत हुकूमशाहीचा उदय झाला.

iv. युरोपीय राष्ट्रांमध्ये अतिरेकी महत्त्वाकांक्षा, परस्पर अविश्वास, वैमनस्य व कलह वाढत गेला. यांमुळे युरोपातील वातावरण स्फोटक बनले.

### युरोपीय राष्ट्रांचा साम्राज्यवाद

***२. युरोपीय देश आशिया व आफ्रिका खंडांकडे वळले.**

**उत्तर:** i. औद्योगिकीकरणामुळे प्रत्येक युरोपियन राष्ट्रास आपल्या उत्पादनासाठी कच्चा माल व बाजारपेठा याची आवश्यकता भासू लागली.

ii. १९ व्या शतकापर्यंत युरोपियन राष्ट्रांना आशिया आणि आफ्रिका खंडांचे आर्थिक महत्त्व समजले होते.

iii. म्हणून, युरोपियनांनी व्यापार सुरळीत रहावा यासाठी या खंडांतील काही महत्त्वाच्या प्रदेशांवर ताबा मिळविण्यास सुरुवात केली.

iv. आशिया व आफ्रिका खंडांतील प्रदेश हुकमी बाजारपेठा व कच्चा माल पुरविणारे प्रदेश होते.

अशा प्रकारे, आपल्या औद्योगिक गरजा पूर्ण करण्यासाठी युरोपीय देश आशिया व आफ्रिका खंडांकडे वळले.

## पहिल्या महायुद्धाची वाटचाल

**३. रशियाने पहिल्या महायुद्धातून माघार घेतली.**

**उत्तर:** i. पहिल्या महायुद्धाच्या वेळेस रशियात साम्यवादी क्रांती झाली.

ii. क्रांतीनंतर रशियात बोल्शेव्हिक सरकार स्थापन झाले.

iii. नव्या सरकारला युद्ध पुढे सुरू ठेवण्यात स्वारस्य नव्हते.

iv. म्हणून, या नव्या सरकारने जर्मनीशी वाटाघाटी करून युद्धातून माघार घेतली.

अशा प्रकारे, रशियाने पहिल्या महायुद्धातून माघार घेतली.

***४. अमेरिकेने ६ एप्रिल १९१७ रोजी जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.** **[मार्च १४]**

**उत्तर:** i. पहिल्या महायुद्धात, जर्मनीने मोठ्या प्रमाणावर पाणबुड्यांच्या युद्धतंत्राचा वापर केला.

ii. इंग्लंडची लुसिटानिया बोट या जर्मन पाणबुड्यांनी बुडविली.

iii. त्यामध्ये अनेक अमेरिकन नागरिक मृत्यू पावले.

iv. जर्मनीने पाणबुड्यांचा अनिर्बंध वापर करू नये असा निर्वाणीचा इशारा अमेरिकेने अनेक वेळा दिला.

v. परंतु, तरीही जर्मनीने पाणबुड्यांचा अनिर्बंध वापर सुरूच ठेवला.

म्हणून, अमेरिकेने ६ एप्रिल १९१७ रोजी जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.

## पहिल्या महायुद्धाचे परिणाम

**५. व्हर्सायच्या तहामध्ये दुसऱ्या महायुद्धाची बीजे रोवली गेली.**

**उत्तर:** i. पहिल्या महायुद्धाच्या शेवटी झालेल्या शांतता करारांपैकी एक व्हर्सायचा तह होता. या तहावर १९१९-१९२० मध्ये स्वाक्षरी करण्यात आली.

ii. व्हर्सायच्या तहाने जर्मनीवर अतिशय अपमानकारक अटी लादण्यात आल्या.

iii. पहिल्या महायुद्धास सर्वस्वी जर्मनीला जबाबदार धरण्यात आले.

iv. जर्मनीवर प्रचंड युद्ध नुकसानभरपाई लादण्यात आली.

जर्मनीवर लादण्यात आलेला 'व्हर्सायचा तह' अपमानकारक व अन्यायकारक म्हणून ओळखला जातो. या सदोष तहामध्येच दुसऱ्या महायुद्धाची बीजे रोवली गेली.

## प्र.४. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३० ते ४० शब्दांत लिहा.

## संघर्षाचे युग

**१. संघर्ष युगाच्या सकारात्मक आणि नकारात्मक बाजू कोणत्या?**

**उत्तर:** i. जगात मूलभूत बदल घडवून आणणाऱ्या २० व्या शतकाच्या सुरुवातीचे यथार्थ वर्णन 'संघर्षाचे युग' या शब्दांत केले जाते.

ii. यास सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही बाजू आहेत.

iii. संघर्ष युगाची सकारात्मक बाजू:

अ. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रचंड प्रगती

ब. हुकूमशाही राजवटीचा विनाश

क. लोकशाहीचा प्रसार

ड. आंतरराष्ट्रवादाचे प्रयोग.

iv. संघर्ष युगाची नकारात्मक बाजू:

अ. या काळात जगातील अनेक देशांच्या सीमा बदलल्या गेल्या.

ब. सशस्त्र संघर्षात लक्षावधी लोक मरण पावले.

## लष्करवाद

**२. युरोपमध्ये लष्करवाद वाढण्याचे काय कारण होते?**

**किंवा**

**युरोपातील राजकारण लष्करी डावपेचांमुळे स्फोटक बनले. स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. आक्रमक राष्ट्रवादाने आंतरराष्ट्रीय तेढ वाढली.

ii. युरोपीय राष्ट्रांनी शांतता व सुरक्षिततेसाठी शस्त्रसज्जता वाढवली.

iii. युद्ध हाच प्रश्न सोडविण्याचा एकमेव मार्ग आहे असे युरोपीय देशांना वाटत होते.

iv. आधुनिक शस्त्रास्त्रे, लढाऊ जहाजे, पाणबुड्या इ. च्या उत्पादनात प्रचंड वाढ झाली.

v. शस्त्रसज्जता शांतता व सुरक्षिततेसाठी आहे असे प्रत्येक राष्ट्र म्हणू लागले.

vi. प्रत्येक राष्ट्र आपल्या लष्करी सामर्थ्याविषयी गुप्तता पाळू लागले.

अशा प्रकारे, युरोपातील राजकारण लष्करी डावपेचांमुळे स्फोटक बनले.

## युरोपीय राष्ट्रांची दोन गटांत विभागणी

**३. युरोपियन राष्ट्रांमध्ये दोन शत्रू गट कसे तयार झाले? त्याचा परिणाम काय झाला?**

**उत्तर:** i. जर्मनीच्या आक्रमक धोरणांमुळे अस्वस्थ होऊन १९०४ साली इंग्लंड आणि फ्रान्स यांच्यात करार झाला व या दोन राष्ट्रांतील वैमनस्य संपुष्टात आले.

ii. १९०७ साली इंग्लंड व रशिया यांच्यामध्ये मैत्री करार झाला.

iii. यामुळे इंग्लंड, फ्रान्स आणि रशिया यांचा मित्रगट तयार झाला.

iv. तर दुसरीकडे मध्य युरोपातील जर्मनी, ऑस्ट्रिया, इटली यांचा मध्यवर्ती राष्ट्रगट तयार झाला.

v. एकमेकांवर मात करता यावी म्हणून दोन्ही गट आपापले सामर्थ्य वाढवू लागले.

vi. त्यांच्यात तीव्र लष्करी स्पर्धा सुरू झाली. या सर्व घटनांमुळे पहिल्या महायुद्धाच्या दिशेने वाटचाल सुरू झाली.

***४. इंग्लंड, फ्रान्स, रशिया या राष्ट्रांना बाल्कन प्रदेशाचे महत्त्व का वाटत होते? [जुलै १६]**

**उत्तर:** i. तुर्कस्तानच्या साम्राज्यात मोडणारा पूर्व युरोपचा प्रदेश हा 'बाल्कन प्रदेश' म्हणून ओळखला जात असे.

ii. या प्रदेशाच्या भौगोलिक महत्त्वामुळे इंग्लंड, रशिया, फ्रान्स यांनी बाल्कन प्रदेशात हस्तक्षेप केला.

iii. तुर्की अधिसत्तेविरुद्ध बाल्कन प्रदेशातील लोकांनी राष्ट्रीय चळवळी सुरू केल्या होत्या.

iv. या प्रदेशातील लोक स्लाव्ह वंशातील असल्याने रशियाने या भागातील चळवळींना पाठिंबा दिला.

v. भूमध्य समुद्रात रशियाचा प्रभाव वाढल्यास आशियातील आपल्या हितसंबंधांना धोका निर्माण होईल अशी भीती इंग्लंड व फ्रान्सला वाटत होती.

vi. बाल्कन प्रदेशावर रशियाचे वर्चस्व प्रस्थापित होऊ नये, म्हणून इंग्लंड व फ्रान्स या भागात हस्तक्षेप करत होते.

**५. ऑस्ट्रिया आणि सर्बिया या दोन देशांत संघर्ष का निर्माण झाला?**

**उत्तर:** i. ऑस्ट्रिया-हंगेरी साम्राज्याची सीमा बाल्कन प्रदेशाला लागून होती.

ii. साम्राज्यविस्तारासाठी ऑस्ट्रियाला बाल्कन प्रदेश सोयीचा होता; म्हणून ऑस्ट्रिया हा प्रदेश ताब्यात घेण्यास पूर्ण तयारीत होता.

iii. बोस्निया व हर्जेगोविना हे दोन प्रांत ऑस्ट्रिया व सर्बियासाठी महत्त्वाचे होते.

म्हणून, ऑस्ट्रिया व सर्बिया या दोन देशांत संघर्ष निर्माण झाला.

**६. राजकीय क्रांतीनंतरची तुर्कस्तानातील परिस्थिती सांगा.**

**उत्तर:** i. तुर्कस्तानात १९०८ साली राजकीय क्रांती झाली.

ii. या परिस्थितीचा फायदा घेऊन ऑस्ट्रियाने बोस्निया व हर्जेगोविना हे दोन प्रांत आपल्या साम्राज्यात विलीन केले.

iii. बल्गेरियानेही आपले स्वातंत्र्य घोषित केले.

iv. म्हणून, बाल्कन प्रदेशात अस्थिर वातावरण निर्माण झाले.

## पहिल्या महायुद्धाची वाटचाल

***७. ऑस्ट्रियाने सर्बियाविरुद्ध युद्ध का पुकारले?**

**उत्तर:** i. ऑस्ट्रिया व सर्बिया ही दोन्ही राष्ट्रे बोस्निया व हर्जेगोविना या बाल्कन प्रदेशांवर ताबा मिळविण्यास उत्सुक होती. त्यामुळे या दोघांत संघर्ष निर्माण झाला.

ii. २८ जून १९१४ रोजी ऑस्ट्रियाचा युवराज आर्चड्युक फ्रान्सिस फर्डिनांड याची एका जहाल सर्बियन नागरिकाने हत्या केली.

iii. या हत्येमुळे सर्बियाला दडपून टाकण्यासाठी ऑस्ट्रियाला एक कारण मिळाले.

iv. ऑस्ट्रियाने अमान्य अशा अटी सर्बियापुढे ठेवल्या व त्या पूर्ण करण्यासाठी फक्त ४८ तासांचा अवधी दिला.

v. त्यावेळी रशियाने सर्बियाला मदतीचे आश्वासन दिले.

vi. रशियाचा सैनिकी पाठिंबा सर्बियाला मिळाल्यामुळे सर्बियाने ऑस्ट्रियाच्या मागण्या अमान्य करण्याचे ठरविले, म्हणून २८ जुलै १९१४ रोजी ऑस्ट्रियाने सर्बियाविरुद्ध युद्ध पुकारले.

### ८. जर्मनीने रशियाविरुद्ध युद्ध का पुकारले?

**उत्तर:** i. ऑस्ट्रियाने सर्बियाविरुद्ध युद्ध घोषित केल्यावर रशियाने सर्बियाला लष्करी मदतीचे आश्वासन दिले.

ii. ऑस्ट्रिया या युद्धात विजयी झाल्यास बाल्कन प्रदेशात ऑस्ट्रियाचा प्रभाव वाढेल याची जाणीव रशियाला होती.

iii. ऑस्ट्रियाला पाठिंबा देणाऱ्या जर्मनीने रशियाला आपली सेना मागे घेण्यासाठी १२ तासांची मुदत दिली.

iv. रशियाने हा इशारा अमान्य केल्याने जर्मनीने रशियाविरुद्ध युद्ध पुकारले.

### ९. पहिले महायुद्ध कसे आणि केव्हा संपुष्टात आले?

**उत्तर:** i. अमेरिका युद्धात उतरल्यामुळे दोस्त राष्ट्रांची बाजू मजबूत झाली. यामुळे युद्धाला कलाटणी मिळाली.

ii. दोस्त राष्ट्रांनी सर्व बाजूंनी जर्मनीची आर्थिक नाकेबंदी सुरू केली, त्यामुळे जर्मनीला शरण यावे लागले.

iii. त्यावेळी जर्मनीत सत्तांतर होऊन प्रजासत्ताकाची स्थापना झाली.

iv. जर्मनीच्या हंगामी सरकारने शेवटी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांच्या १४ कलमी योजनेच्या आधारे शरणागती स्वीकारून युद्धबंदी करारावर स्वाक्षरी केली.

v. अशा प्रकारे, ११ नोव्हेंबर १९१८ रोजी जर्मनीने शरणागती पत्करली व पहिल्या महायुद्धाचा शेवट झाला.

**प्र.५. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ६० ते ८० शब्दांत लिहा.**

## कैसर विल्यम दुसरा

**१. कैसर विल्यम दुसरा याच्या कारकीर्दीत जर्मनीची औद्योगिक प्रगती कशी झाली ते लिहा.**

**उत्तर:** i. १८८८ मध्ये कैसर विल्यम दुसरा जर्मनीचा सम्राट बनला.

ii. त्याच्या कारकीर्दीत जर्मनीची प्रचंड औद्योगिक प्रगती झाली.

iii. कैसर विल्यम दुसरा याने आक्रमक वसाहतवादाचे धोरण स्वीकारून नाविक सैन्याचा विकास केला.

iv. त्याने चीन व मध्य आफ्रिकेतील काही प्रदेश मिळविले.

v. पॅसिफिक महासागरात नाविक तळ उभारण्याच्या दृष्टीने त्याने स्पेनकडून कॅरोलीन, पालाऊ आणि मारियाना ही बेटे विकत घेतली.

vi. पूर्वेकडील इंग्लंडच्या व्यापाराला शह देण्यासाठी कैसर विल्यमने तुर्कस्तानकडून बर्लिन ते बगदाद व तेथून पुढे इराणच्या आखातापर्यंत रेल्वे मार्ग बांधण्याचे अधिकार मिळविले.

vii. त्याने कील कालव्याची पुनर्बांधणी व दुरुस्ती करवून घेतल्यामुळे जर्मन युद्धनौकांना उत्तर समुद्रात प्रवेश करणे सहज शक्य झाले.

## पहिल्या महायुद्धाचे परिणाम

*२. **पहिल्या महायुद्धाचे परिणाम लिहा.**

**[मार्च १४, ऑक्टोबर १४]**

**उत्तर:** पहिल्या महायुद्धात अनेक राष्ट्रे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या सहभागी झाली. या युद्धाचे बरेच दूरगामी परिणाम झाले ते पुढीलप्रमाणे:

**i. जीवित व वित्तहानी:**

अ. पहिल्या महायुद्धात जीवितहानी झाली. संपत्ती आणि साधनसामग्री यांचा प्रचंड विध्वंस झाला.

ब. युद्धामध्ये एक कोटी सैनिक मारले गेले. लाखो लोकांची आहुती पडली. होतकरू तरुण पिढी या युद्धात मारली गेली. युरोपच्या सर्वांगीण जीवनावर त्याचा परिणाम झाला.

**ii. उद्योगधंदे ढासळले:**

अ. युद्धकाळात शेती, उद्योगधंदे मंदावले. त्यामुळे जगातील अनेक राष्ट्रांची आर्थिक स्थिती ढासळली.

ब. अमेरिका, जपान सोडून उर्वरित जगाला आर्थिक महामंदीचा प्रचंड तडाखा बसला.

**iii. जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत वाढ:**

अ. युद्धकाळात, युरोपीय राष्ट्रांनी फक्त शस्त्रास्त्र निर्मितीवरच भर दिल्यामुळे, जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन घटले.

ब. यामुळे जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा निर्माण होऊन महागाई वाढली. याचा परिणाम लोकांच्या दैनंदिन जीवनावर झाला.

**iv. महासत्तेचा उदय:**

अमेरिका युद्धात उशिरा सहभागी झाल्यामुळे अमेरिकेवर युद्धाचा सर्वांत कमी परिणाम झाला होता. त्यामुळे जागतिक राजकारणात महासत्ता म्हणून अमेरिकेचा उदय झाला.

**v. साम्राज्ये नष्ट झाली:**

जर्मनी, रशिया, ऑस्ट्रिया-हंगेरी आणि तुर्कस्तान यांची साम्राज्ये नष्ट झाली.

**vi. नवीन राष्ट्रांचा उदय:**

पराभूत देशांच्या साम्राज्याचे विभाजन करून युरोपमध्ये पोलंड, फिनलंड, रुमानिया, बल्गेरिया, झेकोस्लोव्हाकिया, युगोस्लोव्हिया इ. स्वतंत्र देश निर्माण करण्यात आले.

**vii. राष्ट्रसंघाची स्थापना:**

भविष्यात अशा प्रकारचे विनाशकारी युद्ध उद्‌भवू नये, म्हणून अमेरिकन राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांच्या १४ कलमी योजनेनुसार १९२० साली राष्ट्रसंघाची स्थापना झाली.

**viii. अपमानकारक तह:**

अ. पहिल्या महायुद्धानंतर पराभूत राष्ट्रांवर अनेक तह लादण्यात आले. व्हर्सायच्या तहाने जर्मनीवर अतिशय अपमानास्पद अटी लादण्यात आल्या होत्या.

ब. पहिल्या महायुद्धासाठी सर्वस्वी जर्मनीला जबाबदार धरण्यात आले. त्याचप्रमाणे नुकसान भरपाई लादण्यात आली. या सदोष तहामुळे दुसऱ्या महायुद्धाची बीजे रोवली गेली.

***३. पहिल्या महायुद्धाची कारणे लिहा.**

**उत्तर:** युरोपीय राष्ट्रांमध्ये असलेली अतिरेकी महत्त्वाकांक्षा, परस्पर अविश्वास, वैमनस्य व कलह यातूनच जी स्फोटक परिस्थिती युरोपमध्ये निर्माण झाली त्यातूनच पहिल्या महायुद्धाला सुरुवात झाली. त्याची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे:

**i. युरोपीय राष्ट्रांचा साम्राज्यवाद:**

अ. १९ व्या शतकात युरोपात औद्योगिक प्रगती झाली.

ब. यंत्रांच्या वापरामुळे उत्पादनात वाढ झाल्याने या देशांना युरोपच्या बाहेर बाजारपेठा शोधणे आवश्यक झाले.

क. युरोपीय राष्ट्रे साम्राज्यवादी मानसिकतेने आफ्रिका-आशिया खंडांकडे वळली.

ड. वसाहती मिळविण्यासाठी स्पर्धा सुरू झाली.

इ. या खंडांचे आर्थिकदृष्ट्या महत्त्व समजल्यावर साम्राज्यवादी मानसिकता अधिक तीव्र झाली.

ii. **आक्रमक राष्ट्रवाद:**

अ. सर्व युरोपीय देशांनी आक्रमक राष्ट्रवादाचा अंगीकार करून राष्ट्राचा प्रादेशिक विस्तार वाढवण्यास सुरुवात केली.

ब. आत्यंतिक राष्ट्रवादामुळे आंतरराष्ट्रीय तेढ मोठ्या प्रमाणावर वाढली.

iii. **लष्करवाद:**

अ. युरोपियन राष्ट्रांत एकमेकांबद्दल अविश्वास निर्माण झाला व ती आपले लष्करी सामर्थ्य वाढवू लागली.

ब. आधुनिक शस्त्रास्त्रे, लढाऊ जहाजे, पाणबुड्या इत्यादींच्या उत्पादनात वाढ झाली.

क. प्रत्येक राष्ट्र आपल्या लष्करी सामर्थ्याविषयी गुप्तता पाळू लागली. अशा प्रकारे, युरोपातील राजकारण लष्करी डावपेचांमुळे स्फोटक बनले.

iv. **राजनैतिक गटबाजी:**

अ. बिस्मार्क या जर्मनीच्या सम्राटाने ऑस्ट्रियाशी मैत्री केली.

ब. बिस्मार्क याने इंग्लंड व फ्रान्स एकत्र येऊ नये याची पुरेपूर काळजी घेतली.

क. फ्रान्स आणि इटली या राष्ट्रांमध्ये धार्मिक व वसाहतविषयक वैमनस्य होते. याचाच फायदा घेऊन बिस्मार्कने इटलीला आपल्या बाजूला ठेवून जर्मनी-ऑस्ट्रिया-इटली यांच्यात त्रिराष्ट्र मैत्री करार केला.

v. **युरोपीय राष्ट्रांची दोन गटांत विभागणी:**

अ. युरोप दोन भागांत विभागला गेला. मध्य युरोपीय सत्तेमध्ये जर्मनी-ऑस्ट्रिया-इटली यांचा मध्यवर्ती राष्ट्रगट आणि दुसऱ्या बाजूला मित्र राष्ट्रे ज्यामध्ये इंग्लंड, फ्रान्स आणि रशिया ही राष्ट्रे होती.

ब. एकमेकांवर मात करता यावी म्हणून हे दोन्ही गट आपापले लष्करी सामर्थ्य वाढवू लागले. त्यातूनच पहिल्या महायुद्धाच्या दिशेने वाटचाल सुरू झाली.

vi. **बाल्कन प्रदेशातील राजकीय गुंतागुंत:**

अ. तुर्कस्तानच्या साम्राज्यात मोडणारा पूर्व युरोपचा प्रदेश हा बाल्कन प्रदेश म्हणून ओळखला जातो.

ब. भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचा असल्याने इंग्लंड, फ्रान्स व रशिया यांसारख्या मुख्य युरोपीय राष्ट्रांनी यात हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली.

क. ऑस्ट्रिया व सर्बिया यांनाही बाल्कन प्रदेशातील बोस्निया व हर्जेगोविना या प्रदेशांवर ताबा मिळविण्यात स्वारस्य होते. त्यामुळे या दोघांमध्ये संघर्ष निर्माण झाला.

**vii. ऑस्ट्रियन युवराज आर्चड्युक फ्रान्सिस फर्डिनांड याची हत्या:**

२८ जून १९१४ रोजी बोस्नियाची राजधानी सॅराजेव्हो येथे ऑस्ट्रियाचा युवराज आर्चड्युक फ्रान्सिस फर्डिनांड याची हत्या एका जहाल सर्बियन नागरिकाने केली. हे पहिल्या महायुद्धाचे तत्कालीन कारण ठरले.

**लक्षात ठेवण्यासारख्या महत्त्वाच्या घटना**

| वर्ष | घटना | महत्त्व/परिणाम/ कारणे |
|---|---|---|
| १८६६ | जर्मनीने ऑस्ट्रियाला पराभूत केले. | बिस्मार्कच्या कारकीर्दीत जर्मनी एक प्रबळ राष्ट्र बनले. त्याच काळात जर्मनीने ऑस्ट्रियाचा पराभव केला; परंतु पुढे, बिस्मार्कने आपल्या महत्त्वाकांक्षी ध्येयांसाठी ऑस्ट्रियाशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. |
| १८७१ | आल्सेस-लॉरेनचा ताबा जर्मनीने मिळविला. | फ्रँकफोर्टच्या तहानुसार फ्रान्सचे आल्सेस-लॉरेन हे प्रदेश मिळवल्यानंतर फ्रान्सला एकाकी पाडण्याचे धोरण बिस्मार्कने स्वीकारले. |
| १८८२ | जर्मनी-ऑस्ट्रिया-इटली यांत त्रिराष्ट्र मैत्री करार | — |
| १८८८ | कैसर विल्यम दुसरा जर्मनीचा सम्राट बनला. | कैसर विल्यम दुसराच्या कारकीर्दीत जर्मनीची प्रचंड औद्योगिक प्रगती झाली. |
| १९०२ | इंग्लंड-जपानमध्ये मित्रत्वाचा करार. | आशिया खंडातील आपले साम्राज्य व व्यापार यांच्या संरक्षणासाठी इंग्लंडने पूर्व आशियातील जपानशी मैत्री करार केला. |
| १९०४ | फ्रान्स-इंग्लंड यांनी आपले वैमनस्य संपवले. | जर्मनीच्या विस्तारवादी भूमिकेमुळे फ्रान्सला आपला मित्रगट उभा करण्याची गरज भासू लागली. इंग्लडदेखील कैसर विल्यम दुसराच्या आक्रमक धोरणांना कंटाळला होता; म्हणून इंग्लंडशी करार करून फ्रान्सने आपले वैमनस्य संपवले. |
| १९०७ | रशिया-इंग्लंड यांमध्ये मैत्रीचा करार. | यामुळे इंग्लंड, फ्रान्स व रशिया यांचा (मित्र) राष्ट्रगट तयार झाला. |
| १९०८ | तुर्कस्तानमध्ये राजकीय क्रांती झाली. | — |
| १९१४ | पहिल्या महायुद्धाची सुरुवात. | — |
| १९१४ | २८ जून १९१४ रोजी ऑस्ट्रियाचा युवराज आर्चड्युक फ्रान्सिस फर्डिनांड याची बोस्नियाची राजधानी सॅराजेव्हो येथे हत्या करण्यात आली. | पहिल्या महायुद्धाचे तत्कालीन कारण. |
| १९१५ | इटलीने इंग्लंड व फ्रान्सच्या बाजूने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले. | — |

| | | |
|---|---|---|
| १९१७ | अमेरिकेने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले. | जर्मनीने इंग्लंडची 'लुसिटानिया' ही बोट बुडविली. त्यात अनेक अमेरिकन नागरिक मृत्यू पावले. अमेरिकेने इशारा देऊनही जर्मनीने पाणबुड्यांचा अनिर्बंध वापर सुरूच ठेवला. त्यामुळे ६ एप्रिल १९१७ रोजी अमेरिकेने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले. |
| १९१८ | पहिले महायुद्ध संपुष्टात आले. | अमेरिकेने युद्धात हस्तक्षेप केल्याने दोस्त राष्ट्रांची बाजू मजबूत झाली. जर्मनीच्या सर्व दोस्त राष्ट्रांनी शरणागती पत्करल्यामुळे जर्मनीला युद्धातून माघार घ्यावी लागली. जर्मनीच्या हंगामी सरकारने शरणागती स्वीकारून अमेरिकन राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांच्या १४ कलमी योजनेच्या आधारे युद्धबंदी करारावर स्वाक्षरी केली व ११ नोव्हेंबर १९१८ रोजी पहिल्या महायुद्धाचा शेवट झाला. |
| १९१४-१९१८ | पहिल्या महायुद्धाचा कालावधी | पहिल्या महायुद्धात जीवितहानी, संपत्ती आणि साधनसामग्री यांचा प्रचंड विध्वंस झाला. |
| १९१९-१९२० | पॅरिस शांतता करार अस्तित्वात आला. | ज्या कारणासाठी महायुद्ध झाले, त्याचे निराकरण करण्यासाठी पॅरिस शांतता करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. |
| १९२० | राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. | भविष्यात पहिल्या महायुद्धासारखी विनाशकारी युद्धे उद्भवू नयेत म्हणून अमेरिकन राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांच्या १४ कलमी योजनेनुसार राष्ट्रसंघाची स्थापना झाली. |

## महत्त्वाच्या संज्ञा

| | |
|---|---|
| **संघर्षाचे युग** | जगात मूलभूत बदल आणणाऱ्या २० व्या शतकाच्या सुरुवातीचे वर्णन 'संघर्षाचे युग' या शब्दांत केले आहे. |
| **बाल्कन प्रदेश** | तुर्कस्तानच्या साम्राज्यात मोडणारा पूर्व युरोपचा प्रदेश हा 'बाल्कन प्रदेश' या नावाने ओळखला जात असे. हा प्रदेश भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचा असल्याने बहुतेक युरोपियन राष्ट्रांनी यावर वर्चस्व मिळविण्याचा प्रयत्न केला. |
| **लुसिटानिया** | इंग्लंडची लुसिटानिया ही बोट जर्मन पाणबुड्यांनी बुडविली. त्यामध्ये अनेक अमेरिकन नागरिक मृत्यू पावले. या घटनेने अमेरिकेचा पहिल्या महायुद्धातील सहभाग निश्चित केला. |
| **व्हर्सायचा तह** | पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीवर लादण्यात आलेला तह. या तहानुसार पहिल्या महायुद्धासाठी सर्वस्वी जर्मनीला जबाबदार धरण्यात आले व जर्मनीवर प्रचंड नुकसान भरपाई लादण्यात आली. या तहाने जर्मनीवर अतिशय अपमानकारक अटी लादण्यात आल्या होत्या. या सदोष तहामध्येच पहिल्या महायुद्धाची बीजे रोवली गेली होती. |

## महत्त्वाची नावे

| | |
|---|---|
| **बिस्मार्क** | जर्मनीचा चान्सेलर, ज्याच्या कारकीर्दीत जर्मनी एक प्रबळ राष्ट्र म्हणून उदयास आले. |
| **कैसर विल्यम दुसरा** | जर्मनीचा सम्राट ज्याच्या कारकीर्दीत जर्मनीची प्रचंड औद्योगिक प्रगती झाली. |
| **आर्चड्युक फ्रान्सिस फर्डिनांड** | ऑस्ट्रियाचा युवराज. याची २८ जून १९१४ रोजी बोस्नियाची राजधानी सॅराजेव्हो येथे एका जहाल सर्बियन नागरिकाने हत्या केली. |
| **वुड्रो विल्सन** | पहिल्या महायुद्धाच्या वेळेस अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष. |

## उजळणी तक्ता

### पहिल्या महायुद्धाची कारणे

- युरोपियन राष्ट्रांचा साम्राज्यवाद
- आक्रमक राष्ट्रवाद
- लष्करवाद
- राजनैतिक गटबाजी
- कैसर विल्यम दुसरा याचे आक्रमक धोरण
- युरोपीय राष्ट्रांची दोन गटांत विभागणी
- बाल्कन प्रदेशातील राजकीय गुंतागुंत
- आर्चड्युक फ्रान्सिस फर्डिनांड याची हत्या

### पहिल्या महायुद्धाचे परिणाम

- प्रचंड जीवितहानी व संपत्ती आणि साधनसामग्रीचा विध्वंस
- एक कोटी सैनिकांचा मृत्यू व लाखो लोकांची आहुती
- होतकरू तरुणांची पिढी या युद्धात मारली गेली.
- युरोपातील उद्योग बंद पडून अर्थव्यवस्था ढासळली.
- महागाई वाढल्यामुळे लोकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम झाला.
- अमेरिकेचा महासत्ता म्हणून उदय.
- साम्राज्ये नष्ट झाली. नवीन राष्ट्रांचा उदय झाला.
- राष्ट्रसंघाची स्थापना

## ब. रशियन राज्यक्रांती

### पार्श्वभूमी

**१. रशियात रोमॅनोव्ह घराण्यातील झार राजवटीच्या काळात काय परिस्थिती होती?**

**उत्तर:** i. रोमॅनोव्ह घराण्यातील झार राजवटीच्या काळात रशियातील राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती खालावली होती.

ii. सामान्य जनतेची स्थिती दयनीय झालेली होती. कारखानदार कामगारांचे शोषण करत होते.

### क्रांतीच्या उंबरठ्यावरील रशिया

**२. आपल्या लेखनातून उदारमतवाद आणि मानवतावाद यांचा पुरस्कार करणाऱ्या रशियन लेखकांची नावे सांगा.**

**उत्तर:** रशियन लेखक अलेक्झांडर पुष्किन, दोस्तोवस्की, लिओ टॉलस्टॉय, मॉक्झिम गॉर्की यांनी आपल्या लेखनातून उदारमतवाद आणि मानवतावाद यांचा पुरस्कार केला.

**३. निहिलिस्ट नामक विचारवंतांचा विचार करण्याचा दृष्टिकोन काय होता?**

**उत्तर:** i. निहिलिस्ट विचारवंतांना सरकार, धर्म, विवाह, नीतितत्त्वे अशी बंधने नसलेले निखळ व्यक्तिस्वातंत्र्य हवे होते.

ii. बुद्धीवादावर आधारित समाजव्यवस्था त्यांना हवी होती.

## कार्ल मार्क्स (१८१८ – १८८३)

**४. कार्ल मार्क्सने साम्यवादाचा सिद्धान्त का मांडला?**

**उत्तर:** अन्याय व शोषणावर आधारलेली समाजव्यवस्था बदलून शोषणरहित समाज निर्मितीसाठी कार्ल मार्क्सने साम्यवादाचा सिद्धान्त मांडला.

**५. कार्ल मार्क्सने कोणते आवाहन केले होते?**

**उत्तर:** कार्ल मार्क्सने जगातील कामगारांनी संघटित होऊन परिवर्तन घडविले पाहिजे असे आवाहन केले होते.

**६. साम्यवादी तत्त्वज्ञानानुसार समाजात कोणते दोन वर्ग मानले आहेत?**

**उत्तर:** i. साम्यवादी तत्त्वज्ञानानुसार 'आहे रे' आणि 'नाही रे' हे दोन वर्ग मानले आहेत.

ii. 'आहे रे' वर्गाकडे उत्पादनाच्या साधनांची मालकी असते, तर 'नाही रे' वर्गाच्या हातात काहीच असत नाही.

## रशियातील जुलमी राजवट

**७. रशियन झारला जुलमी सत्ताधीश का म्हटले जाते?**

**उत्तर:** रशियन झारला जुलमी सत्ताधीश म्हटले जाते कारण त्याने उदारमतवादी व पुरोगामी विचारांना नेहमीच विरोध केला. रशियन लोकांच्या आशा-आकांक्षांचा ते विचार करत नसत.

**८. झारच्या राजवटीत कामगारांची परिस्थिती कशी होती?**

**उत्तर:** झारच्या राजवटीत कामगारांची परिस्थिती निकृष्ट राहणीमान व कारखानदारांकडून होणारे शोषण यांमुळे खालावली होती.

***९. १८९८ साली रशियन सोशल डेमॉक्रॅटिक लेबर पार्टीची स्थापना कशी झाली? [मार्च १४]**

**उत्तर:** i. झारच्या कारकीर्दीत कामगारांची दयनीय अवस्था होती.

ii. अपुरे वेतन, कामाचे जादा तास, असुरक्षित आणि निकृष्ट राहणीमान यामुळे कामगार त्रस्त झाले होते.

iii. आपली परिस्थिती सुधारण्यासाठी कामगारांनी केलेल्या संघटित प्रयत्नांना झार सत्तेने सतत विरोध केला.

iv. त्यामुळे कामगार संघटना गुप्तपणे काम करत असत.

झारच्या धोरणांना विरोध करण्यासाठी कामगार संघटनांनी एकत्रित येऊन १८९८ साली रशियन सोशल डेमॉक्रॅटिक लेबर पार्टीची स्थापना केली.

## रक्तरंजित रविवार

**१०. रशियामध्ये झारविरोधी असंतोषाचा भडका का उडाला?**

**उत्तर:** १९०४-०५ मध्ये जपानकडून झालेल्या रशियाच्या पराभवामुळे रशियामध्ये झारविरोधी असंतोषाचा भडका उडाला.

## सेंट पीटर्सबर्ग येथील कामगारांचा उठाव

***११. सेंट पीटर्सबर्ग येथील उठावाचा परिणाम काय झाला?**

**उत्तर:** i. ऑक्टोबर १९०५ मध्ये, संपाच्या कार्यात सुसूत्रता यावी व कामगारांना योग्य मार्गदर्शन करावे यासाठी सेंट पीटर्सबर्ग येथे कामगार प्रतिनिधींनी एकत्र येऊन पीटर्सबर्ग सोविएतची स्थापना केली. व सशस्त्र दले उभारण्याचे आवाहन केले.

ii. सेंट पीटर्सबर्ग येथील उठावामुळे झार निकोलस दुसरा याने ऑक्टोबर १९०५ मध्ये जाहीरनामा काढून राजकीय सुधारणांचे आश्वासन देशाला दिले.

iii. त्यानुसार प्रजेला मूलभूत अधिकार, मतदानाचा अधिकार, राष्ट्रीय निवडणूक, राष्ट्रीय कायदेमंडळाला विशेष अधिकार देण्याचे आश्वासन दिले.

## ड्युमाची बरखास्ती

***१२. रशियातील लोकशाहीचा प्रयोग का फसला?**

**उत्तर:** i. रशियात लोकशाही प्रशासन आणण्यासाठी डयुमाचे संघटन करण्याचा निर्णय झाला.

ii. १९०६ साली पहिल्या ड्युमाची निवडणूक झाली. ड्युमाने घेतलले निर्णय झारला मान्य नसल्याने त्याने पहिली ड्युमा बरखास्त केली.

iii. दुसऱ्यांदा निवडणूक होऊन नव्याने ड्युमा स्थापन झाली. दुसऱ्या ड्युमाचेही झारशी मतभेद झाल्याने दुसरी ड्युमाही झारने बरखास्त केली.

iv. तिसरी ड्युमा मात्र झारच्या हातातील बाहुले बनली. तिच्याकडून काही उल्लेखनीय कामगिरी घडू शकली नाही. पुढील काळात ड्युमाचे अस्तित्व फक्त कागदावरच राहिले.

अशा प्रकारे, रशियातील लोकशाहीचा प्रयोग पूर्णपणे फसला.

## रासपुतीन प्रकरण

**१३. पहिल्या महायुद्धात निर्माण झालेल्या रशियाच्या दयनीय परिस्थितीस कोण जबाबदार होते?**

**उत्तर:** रशियाची राणी झरीना अलेक्झांड्रा आणि तिचा निकटचा सल्लागार रासपुतीन हे पहिल्या महायुद्धात निर्माण झालेल्या रशियाच्या दयनीय परिस्थितीस जबाबदार होते.

## क्रांती पर्व

**१४. झारविरोधी आंदोलन स्पष्ट करा.**

**उत्तर:** i. १९१७ साली रशियातील कामगार व सैनिकांनी एकत्र येऊन सरकारविरोधी आंदोलन केले. याला झारविरोधी आंदोलन म्हणतात.

ii. झारने राज्यत्याग करावा यासाठी जनतेचा दबाव वाढला.

iii. शेवटी १५ मार्च १९१७ रोजी झारने सिंहासन सोडले.

**१५. रशियात स्थापन झालेल्या हंगामी सरकारची रूपरेषा काय होती?**

**उत्तर:** i. झारने सिंहासन सोडले आणि रशियात मेन्शेव्हिक गटाने मवाळ हंगामी सरकार स्थापन केले.

ii. त्यामध्ये जमीनमालक, भांडवलदार, उत्पादक आणि व्यावसायिकांचे प्रतिनिधी होते.

iii. मेन्शेव्हिक गटातील केरेन्स्की याने हंगामी सरकारचे नेतृत्व केले.

## लेनिनचे नवे आर्थिक धोरण (NEP)

**१६. लेनिनच्या नव्या आर्थिक धोरणांची वैशिष्ट्ये काय होती?**

**उत्तर:** लेनिनच्या नव्या आर्थिक धोरणांची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे:

i. शेतीत खुलेपणा

ii. मुक्त व्यापार

iii. नवे चलन

iv. लहान व जड उद्योग.

## प्र.३. खालील विधानांची कारणे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा.

### पार्श्वभूमी

***१. रशियात सामान्य जनतेची आणि कामगारांची स्थिती दयनीय झाली होती.**

**उत्तर:** i. झारच्या राजवटीत रशियातील राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती खालावली होती.

ii. सरंजामशाही व्यवस्था व भूदास प्रथा यांमुळे सामान्य जनतेची स्थिती दयनीय झालेली होती.

iii. औद्योगिक विकास सर्वसामान्यांच्या गरजा भागविण्यास अपुरा पडत होता.

iv. कारखानदार कामगारांचे शोषण करत होते.

v. रशियन झार जुलमी सत्ताधीश होते. त्यांनी उदारमतवादी व पुरोगामी विचारांना विरोध केला.

vi. यामुळे लोकांमध्ये असंतोष निर्माण झाला.

अशा प्रकारे, रशियात सामान्य जनतेची आणि कामगारांची स्थिती दयनीय झाली होती.

***२. रशियाचा सर्वांगीण विकास होऊ शकला नाही.**

**[मार्च १५, जुलै १५]**

**उत्तर:** i. रशियन झार जुलमी सत्ताधीश होते. त्यांनी नेहमीच उदारमतवादी व पुरोगामी विचारांना विरोध केला.

ii. झारच्या कारकीर्दीत काही प्रमाणात औद्योगिक विकास घडूनही जनसामान्यांच्या गरजा भागविण्यासाठी या प्रगतीचा काहीच उपयोग झाला नाही.

iii. आधुनिक साधनांचा व तंत्राचा वापर होत नसल्यामुळे कारखान्यातून निकृष्ट उत्पादन होत होते. जुन्या व अपुऱ्या सोयींमुळे शेती मागासलेल्या अवस्थेत होती.

iv. झारच्या साम्राज्यवादी धोरणामुळे त्यांचे अंतर्गत सुधारणांकडे दुर्लक्ष होत होते.

म्हणून, रशियाचा सर्वांगीण विकास होऊ शकला नाही.

***३. भिन्नवंशीय गट झार सत्तेवर रुष्ट होते.**

**उत्तर:** i. रशियन समाजात मूळ स्लाव्ह वंशाबरोबरच अन्य अल्पसंख्यांक समाजाचा अंतर्भाव होता.

ii. भिन्नवंशीय गटांना सतत दडपून ठेवण्याचे धोरण झारने अवलंबले होते.

म्हणून, भिन्नवंशीय गट झार सत्तेवर रुष्ट होते.

## रासपुतीन प्रकरण

**४. दरबारी मंडळींनी रासपुतीनची हत्या केली.**

**उत्तर:** i. रासपुतीन हा सर्बियन ढोंगी, लाचखोर, धूर्त कपटी व संधिसाधू मांत्रिक असून राणी झरीनाचा निकटचा सल्लागार होता.

ii. पहिल्या महायुद्धात निर्माण झालेल्या परिस्थितीला रशियाची राणी झरीना अलेक्झांड्रा व तिचा निकटचा सल्लागार रासपुतीन हेच जबाबदार आहेत असे अनेकांचे मत होते.

iii. झार निकोलससुद्धा रासपुतीनच्या सल्ल्यानुसार वागू लागला.

iv. रासपुतीनचा वाढता प्रभाव दरबारी मंडळींना मान्य नव्हता.

म्हणून, दरबारी मंडळींनी रासपुतीनची हत्या केली.

**५. रशियातील हंगामी सरकार जनतेचा विश्वास जिंकू शकले नाही.**

**उत्तर:** i. झारने राज्यत्याग केल्यावर मेन्शेव्हिक गटातील मवाळ नेत्यांनी केरेन्स्कीच्या नेतृत्वाखाली हंगामी सरकार स्थापन केले.

ii. हंगामी सरकारने महायुद्धात जर्मनीविरुद्ध युद्ध सुरूच ठेवले.

iii. आधुनिक युद्धसामग्रीच्या अभावामुळे रशियन सैनिकांची पिछेहाट झाली.

iv. सैनिक, कामगार व शेतकरी यांच्यात सरकारविरोधी असंतोष वाढला. हंगामी सरकारला ही परिस्थिती नियंत्रणात आणता आली नाही.

यामुळे, रशियातील हंगामी सरकार जनतेचा विश्वास जिंकू शकले नाही.

## प्र.४. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३० ते ४० शब्दांत लिहा.

### पार्श्वभूमी

***१. रशियाची आर्थिक स्थिती का ढासळली?**

**उत्तर:** i. रशियाची औद्योगिक प्रगती इतर युरोपीय राष्ट्रांच्या तुलनेत फारशी चांगली नव्हती.

ii. उद्योगधंद्यांवर भांडवलदार वर्गाचे वर्चस्व होते व ते कामगारांचे शोषण करत होते.

iii. आधुनिक साधनांचा व तंत्रांचा वापर न केल्यामुळे कारखान्यातून निकृष्ट उत्पादन होत होते.

iv. म्हणून, रशियातील आर्थिक स्थिती ढासळली.

२. **कार्ल मार्क्सविषयी सविस्तर माहिती लिहा.**

**किंवा**

***कार्ल मार्क्सचे विचार थोडक्यात सांगा.**

उत्तर: i. कार्ल मार्क्स हा जर्मन साम्यवादी विचारवंत होता.

ii. कार्ल मार्क्सने 'दास कॅपिटल' व 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' हे दोन जगप्रसिद्ध ग्रंथ लिहिले.

iii. त्याने मानवी समाजाच्या विकासाचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण केले.

iv. अन्याय व शोषणावर आधारलेली समाजव्यवस्था बदलून शोषणरहित समाज निर्मितीचा साम्यवादी मार्गही त्याने दाखवून दिला.

v. कार्ल मार्क्सच्या विचारधारेनुसार:

अ. मानवी समाज गतिमान आहे, तो परिवर्तनशील आहे आणि कोणतीही अतिमानवी शक्ती हे परिवर्तन घडवत नाही.

ब. परिवर्तनाची बीजे अर्थकारणात दडलेली असतात.

क. समाजाचे आर्थिक व्यवहार बदलले, की त्याबरोबर राजकीय विचार, सामाजिक चालीरीती व मूल्येही बदलतात.

vi. जगातील कामगारांनी संघटित होऊन परिवर्तन घडविले पाहिजे असे आवाहन त्याने केले होते.

## सेंट पीटर्सबर्ग येथील कामगारांचा उठाव

**३. सेंट पीटर्सबर्ग येथील कामगारांच्या उठावाबद्दल लिहा.**

**किंवा**

**सेंट पीटर्सबर्ग सोविएत म्हणजे काय?**

**उत्तर:** i. ऑक्टोबर १९०५ साली रशियात सर्वत्र कामगारांचा संप चालू होता.

ii. संपाच्या कार्यात सुसूत्रता यावी, कामगारांना योग्य मार्गदर्शन करावे यासाठी कामगार प्रतिनिधींनी एकत्र येऊन संघटनेची स्थापना केली.

iii. जिला 'पीटर्सबर्ग सोविएत' म्हणतात.

iv. या उठावामुळे झार निकोलस दुसरा याने ऑक्टोबर १९०५ मध्ये जाहीरनामा (घोषणापत्र) काढून राजकीय सुधारणांचे आश्वासन देशाला दिले.

v. त्यानुसार प्रजेला मूलभूत अधिकार, मतदानाचा अधिकार, राष्ट्रीय निवडणूक, राष्ट्रीय कायदेमंडळाला विशेष अधिकार देण्याचे आश्वासन दिले.

४. **रक्तरंजित रविवारची घटना स्पष्ट करा.**

**किंवा**

***'रक्तरंजित रविवार' बद्दलची माहिती लिहा.**

**[जुलै १६]**

**उत्तर:** i. १९०४-०५ मध्ये युद्धात जपानने बलाढ्य रशियाला पराभूत केले; म्हणून रशियात झारविरोधी असंतोषाचा भडका उडाला.

ii. जपानबरोबर झालेल्या युद्धामुळे रशियाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले.

iii. फादर गेपॉन यांच्या नेतृत्वाखाली अनेक कामगार सेंट पीटर्सबर्ग येथील राजवाड्यावर मोर्चा घेऊन गेले.

iv. झारच्या सैनिकांनी कामगारांच्या मोर्चावर अमानुष गोळीबार केला आणि त्यात शेकडो लोक मारले गेले.

v. ही घटना १९०५ साली रविवारी घडली, म्हणून रशियाच्या इतिहासात हा दिवस 'रक्तरंजित रविवार' म्हणून ओळखला जातो.

***५. लेनिनचे नवे आर्थिक धोरण स्पष्ट करा.**

**[मार्च १५, १६]**

**उत्तर:** i. लेनिनच्या नव्या आर्थिक धोरणात काही प्रमाणात खाजगीकरण व काही प्रमाणात राष्ट्रीयीकरण कायम ठेवण्यात आले.

ii. खाजगी उद्योग, खाजगी व्यापार व खाजगी मालमत्तेला विशिष्ट मर्यादेपर्यंत मान्यता दिली.

iii. लेनिनच्या या धोरणाला कट्टर साम्यवादी नेत्यांनी विरोध केला असता भांडवलशाही तत्त्वांशी केलेली ही तात्पुरती तडजोड आहे असे लेनिनने नव्या आर्थिक धोरणाचे समर्थन केले.

iv. दळणवळण व परराष्ट्र व्यापार पूर्णपणे सरकारच्या ताब्यात होते.

**धोरणाचे परिणाम:**

i. या धोरणामुळे कृषी व औद्योगिक उत्पादनात प्रचंड वाढ झाली.

ii. पूर्वीपेक्षा अधिक जमीन लागवडीखाली आली.

iii. औद्योगिक क्षेत्रात थोड्या प्रमाणात खाजगी उद्योगांना परवानगी देण्यात आली. उद्योगांना मालाची खरेदी-विक्री खुल्या बाजारात करण्याची मुभा देण्यात आली.

iv. नव्या आर्थिक धोरणामुळे औद्योगिक क्षेत्रातील उत्पादनालाही झपाट्याने गती मिळाली.

## प्र.५. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ६० ते ८० शब्दांत लिहा.

### क्रांती पर्व

**१. रशियन क्रांती पर्वाची माहिती लिहा.**

**उत्तर:** i. १९१७ साली रशियातील कामगार व सैनिकांनी एकत्र येऊन सरकारविरोधी आंदोलन केले.

ii. झारने राज्यत्याग करावा यासाठी जनतेचा दबाव वाढला.

iii. शेवटी १५ मार्च १९१७ रोजी झारने राज्यत्याग केला.

iv. त्यानंतर केरेन्स्की याच्या नेतृत्वाखाली मेन्शेव्हिक गटाने मवाळ हंगामी सरकार स्थापन केले.

v. हंगामी सरकारने पहिल्या महायुद्धात आपला सहभाग सुरूच ठेवला.

vi. मात्र, आधुनिक युद्धसामग्रीच्या अभावामुळे रशियन सैनिकांची पिछेहाट झाली.

vii. यामुळे सैनिक, कामगार व शेतकरी यांच्यात सरकारविरोधी असंतोष वाढला.

viii. एप्रिल १९१७ मध्ये बोल्शेव्हिक नेता लेनिन रशियात परतला.

ix. लेनिन व मेन्शेव्हिक गटाचा मवाळ नेता केरेन्स्की यांच्यात मोठा संघर्ष उभा राहिला.

x. ७ नोव्हेंबर १९१७ रोजी बोल्शेव्हिकांनी केरेन्स्कीच्या नेतृत्वाखालील हंगामी सरकार बरखास्त केल्याचे जाहीर केले.

अशा प्रकारे, रशियन क्रांती पर्व समाप्त झाले.

***२. रशियन राज्यक्रांतीनंतर रशियाच्या विकासातील लेनिनचे योगदान स्पष्ट करा.**

**उत्तर:** रशियाच्या विकासात लेनिनचे योगदान उल्लेखनीय आहे:

i. स्वित्झर्लंडमध्ये अज्ञातवासात असलेला बोल्शेव्हिक नेता लेनिन १९१७ च्या एप्रिलमध्ये रशियात परतला.

ii. हा कुशाग्र बुद्धिमत्तेचा जहाल क्रांतिकारी विचारवंत होता.

iii. सरंजामशाही, भूदास प्रथा व जुलमी झारशाही नष्ट झाल्याशिवाय रशियाची प्रगती होणार नाही असे त्याचे ठाम मत होते.

iv. उद्योगक्षेत्रातील भांडवलशाही त्याने नष्ट केली.

v. खाजगी मालमत्ता ताब्यात घेऊन संपत्तीचे राष्ट्रीयीकरण केले.

vi. जमीनदारांकडून जमिनी काढून जमिनीचे भूमीहीन व कसणाऱ्यांकडे समान वाटप केले.

vii. शासनामध्ये केवळ श्रमजीवी वर्गाचे प्रभुत्व असले पाहिजे असे त्याचे मत होते.

viii. कामगारांना वेतनाची रोख रक्कम देण्याऐवजी घरे, अन्न, वस्त्र व इतर सोयी पुरविल्या.

ix. अशा प्रकारे, रशियात साम्यवादी अर्थव्यवस्थेची निर्मिती झाली.

***३. रशियन राज्यक्रांतीचे महत्त्व स्पष्ट करा.**

**उत्तर:** १९ व्या शतकात रशियातील तत्कालीन राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती खालावली होती. रशियन राज्यक्रांतीमुळे झारची राजवट लयास गेली व रशियात महत्त्वपूर्ण बदल घडून आले. ते पुढीलप्रमाणे:

i. रशियन राज्यक्रांतीमुळे श्रमजीवी वर्गाला महत्त्वाचे स्थान मिळाले.

ii. आर्थिक नियोजनाच्या मार्गाने विकास साधण्याची संकल्पना या क्रांतीने जगाला दिली.

iii. धर्मविरहित, वर्गविरहित व शोषणरहित नवी समाजरचना प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न या क्रांतीमुळे झाला.

iv. 'कल्याणकारी राज्य' या संकल्पनेचा जगभर स्वीकार झाला.

v. सर्व प्रकारच्या बंधनातून मुक्ती हा रशियन राज्यक्रांतीचा महत्त्वाचा संदेश होता.

vi. या क्रांतीने रशियाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व वैज्ञानिक क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले.

vii. या क्रांतीने नवीन जीवनमूल्ये प्रसारात आणली.

viii. पूर्वेकडील राष्ट्रांचे नेतृत्व रशियाने केले.

ix. समता, सहकार्य व विश्वबंधुत्वाचा आदर्श या क्रांतीने मानवासमोर ठेवला.

**४. रशियन राज्यक्रांतीची कारणे लिहा.**

**उत्तर:** इ.स. १९१७ साली रशियात झालेल्या राज्यक्रांतीमध्ये कार्ल मार्क्सच्या साम्यवादी विचारांचे मोठे योगदान होते. रशियन राज्यक्रांतीमध्ये रशियन सम्राट व त्याचे साथीदार एका बाजूला आणि कामगार व शेतकरी दुसऱ्या बाजूला यांच्यातील संघर्ष होता.

**रशियन राज्यक्रांतीची मुख्य कारणे खालीलप्रमाणे:**

**i. रोमॅनोव्ह घराण्यातील झार:**

रोमॅनोव्ह घराण्यातील झारच्या राजवटीत रशियाची आर्थिक, राजकीय व सामाजिक परिस्थिती खालावली होती.

सामान्य जनतेची स्थिती दयनीय झाली होती व कारखानदार कामगारांचे शोषण करत होते.

**ii. क्रांतीच्या उंबरठ्यावरील रशिया:**

१९ व्या शतकाच्या मध्यात रशियात क्रांतिकारी विचारांचा प्रसार झाला. रशियन लेखक व विचारवंतांनी आपल्या लेखनातून उदारमतवाद व मानवतावादाचा पुरस्कार केला.

निहिलिस्ट नामक विचारवंतांना निखळ व्यक्तिस्वातंत्र्य हवे होते. हे विचार कार्ल मार्क्सच्या साम्यवादी विचारसरणीतून आले होते.

**iii. रोमॅनोव्ह घराण्याची जुलमी राजवट:**

झार सत्तेच्या काळात रशियात सामाजिक विषमता पराकोटीला पोहोचली होती.

सरंजामशाही व भूदास प्रथा यांमुळे सामान्य जनतेची स्थिती दयनीय झालेली होती.

कामगारांचे शोषण सुरू होते व शेतकरी जादा जमिनीची मागणी करत होते.

झार हे जुलमी सत्ताधीश असल्यामुळे ते उदारमतवादी व पुरोगामी विचारांना नेहमीच विरोध करत असत.

लोकांच्या आशा-आकांक्षांचा ते विचार करत नसत.

यामुळे, जनतेच्या मनात झारविरोधी असंतोषाची भावना निर्माण झाली.

iv. **रक्तरंजित रविवार:**

रशियात झारविरोधी वातावरण तयार झाले होते. फादर गेपॉन यांच्या नेतृत्वाखाली अनेक कामगार सेंट पीटर्सबर्ग येथील राजवाड्यावर मोर्चा घेऊन गेले.

झारच्या सैनिकांनी कामगारांच्या मोर्चावर अमानुष गोळीबार केला. त्यामध्ये शेकडो लोक मारले गेले.

ही घटना २२ जानेवारी १९०५ रोजी रविवारी घडली म्हणून याला 'रक्तरंजित रविवार' म्हणतात.

v. **सेंट पीटर्सबर्ग येथील उठाव:**

ऑक्टोबर १९०५ मध्ये रशियात सर्वत्र कामगारांचा संप चालू होता.

संपाच्या कार्यात सुसूत्रता यावी, कामगारांना योग्य मार्गदर्शन मिळावे म्हणून कामगार प्रतिनिधींनी एकत्र येऊन पीटर्सबर्ग सोविएतची स्थापना केली.

झार निकोलस दुसरा याने ऑक्टोबर १९०५ मध्ये जाहीरनामा काढून राजकीय सुधारणांचे देशाला आश्वासन दिले.

त्यानुसार प्रजेला मूलभूत अधिकार, मतदानाचा अधिकार, राष्ट्रीय निवडणूक, राष्ट्रीय कायदेमंडळाला विशेष अधिकार देण्याचे आश्वासन दिले.

vi. **ड्युमाची बरखास्ती:**

रशियात लोकशाही प्रशासन यावे अशी मागणी होती.

१९०६ साली पहिल्या ड्युमाची निवडणूक झाली.

ड्युमाने घेतलेले निर्णय झारला मान्य नसल्याने झारने पहिली ड्युमा बरखास्त केली.

दुसऱ्यांदा निवडणूक होऊन नव्याने ड्युमा स्थापन झाली व झारशी मतभेद झाल्याने ही ड्युमा पण बरखास्त झाली.

तिसरी ड्युमा मात्र झारच्या हातातील बाहुले बनली.

तिच्याकडून काही उल्लेखनीय कामगिरी पार पडली नाही व रशियात लोकशाहीचा प्रयोग फसला.

vii. **रासपुतीन प्रकरण:**

रासपुतीन हा सर्बियन ढोंगी, लाचखोर, धूर्त, कपटी व संधिसाधू मांत्रिक होता.

पहिल्या महायुद्धात निर्माण झालेल्या परिस्थितीला रशियाची राणी झरीना अलेक्झांड्रा व तिचा निकटचा सल्लागार रासपुतीन हेच जबाबदार आहेत असे अनेकांचे मत होते.

झार निकोलससुद्धा रासपुतीनच्या सल्ल्यानुसार वागू लागला.

रासपुतीनचा वाढता प्रभाव दरबारी मंडळींना मान्य नव्हता; म्हणून दरबारी मंडळींनी रासपुतीनची हत्या केली.

५. **रशियन राज्यक्रांतीची माहिती खालील मुद्द्यांनुसार लिहा:**

**अ. रशियातील जुलमी राजवट**

**ब. लेनिनचे योगदान**

**उत्तर: अ. रशियातील जुलमी राजवट:**

i. रशियन झार हे जुलमी सत्ताधीश असल्यामुळे ते उदारमतवादी व पुरोगामी विचारांना नेहमीच विरोध करत असत.

ii. लोकांच्या आशा-आकांक्षांचा ते विचार करत नसत.

iii. झारच्या साम्राज्यवादी धोरणामुळे त्यांचे अंतर्गत सुधारणांकडे दुर्लक्ष होत होते.

iv. जनसामान्य व कामगारांची परिस्थिती दयनीय होती. अन्नधान्याची मागणी वाढल्यामुळे शेतकऱ्यांची जादा जमीन मिळावी अशी मागणी होती.

v. अशा प्रकारे, लोकांमध्ये झारच्या धोरणांविरुद्ध असंतोषाचे वातावरण तयार झाले.

## ब. लेनिनचे योगदान:

i. लेनिन हा जहाल क्रांतिकारी बोल्शेव्हिक नेता होता. त्याच्यावर मार्क्सवादी तत्वज्ञानाचा प्रभाव होता.

ii. सरंजामशाही, भूदास प्रथा व जुलमी झारशाही नष्ट झाल्याशिवाय रशियाची प्रगती होणार नाही असे त्याचे ठाम मत होते.

iii. स्वित्झर्लंडमधून अज्ञातवासातून परत आलेल्या लेनिनने १९१७ मध्ये केरेन्स्कीच्या नेतृत्वाखालील हंगामी सरकार बरखास्त केले.

iv. लेनिनने उद्योगक्षेत्रातील भांडवलशाही नष्ट केली.

v. जमीनदारांकडून जमिनी काढून जमिनीचे भूमीहीन व कसणाऱ्यांकडे समान वाटप केले.

vi. शासनामध्ये केवळ श्रमजीवी वर्गाचे प्रभुत्व असले पाहिजे असे त्याचे मत होते.

vii. कामगारांना वेतनाची रोख रक्कम देण्याऐवजी त्यांना घरे, अन्न, वस्त्र व इतर सोयी पुरविल्या.

viii. अशा प्रकारे, लेनिनने रशियामध्ये साम्यवादी अर्थव्यवस्थेची निर्मिती केली.

## लक्षात ठेवण्यासारख्या महत्त्वाच्या घटना

| वर्ष | घटना | महत्त्व/परिणाम/ कारणे |
|---|---|---|
| १८४८ | 'समाजवादाचा जाहीरनामा' पुस्तिका प्रकाशित. | कार्ल मार्क्स या जर्मन साम्यवादी विचारवंताने अन्याय व शोषणावर आधारलेली समाजव्यवस्था बदलून शोषणरहित समाज निर्मितीचा साम्यवादी मार्ग दाखवून दिला. |
| १८९८ | 'रशियन सोशल डेमोक्रॅटिक लेबर पार्टीची' स्थापना | झार सत्तेच्या विरुद्ध रशियातील कामगार संघटनांनी एकत्र येऊन 'रशियन सोशल डेमोक्रॅटिक लेबर पार्टीची' स्थापना केली. |
| १९०४-०५ | जपानने रशियाला पराभूत केले. | यामुळे रशियामध्ये झारविरोधी असंतोषाचा भडका उडाला. |
| १९०५ | रक्तरंजित रविवार घटना घडली. | १९०५ साली रविवारी झार सैनिकांनी कामगारांच्या मोर्चावर अमानुष गोळीबार केला. त्यामध्ये शेकडो लोक मारले गेले. |
| १९०६ | पहिल्या ड्युमाची निवडणूक झाली. | देशात लोकशाही प्रशासन आणण्यासाठी ड्युमाचे (रशियाच्या संसदेचे) संघटन करण्याचा निर्णय झाला. |
| १९१७ | झारविरोधी आंदोलन | झार सरकारने राज्यत्याग करावा यासाठी रशियातील कामगार व सैनिकांनी एकत्र येऊन सरकारविरोधी आंदोलन केले. झारने राज्यत्याग करावा यासाठी जनतेचा दबाव वाढला. शेवटी १५ मार्च १९१७ रोजी झारने सिंहासन सोडले. |
| १९१७ | बोल्शेव्हिकांनी केरेन्स्कीच्या नेतृत्वाखालील हंगामी सरकार बरखास्त केले. | १९१७ च्या एप्रिलमध्ये बोल्शेव्हिक नेता लेनिन रशियात परतला. त्यावेळी लेनिन आणि मेन्शेव्हिक गटाचा मवाळ नेता केरेन्स्की यांच्यात संघर्ष उभा राहिला. ७ नोव्हेंबर १९१७ रोजी बोल्शेव्हिकांनी केरेन्स्कीच्या नेतृत्वाखालील हंगामी सरकार बरखास्त केले. |

## महत्त्वाच्या संज्ञा

| | |
|---|---|
| **झार** | प्राचीन काळात रशियन राजांना 'झार' असे संबोधले जात असे. |
| **'दास कॅपिटल' आणि कम्युनिस्ट मॅनिफेस्टो** | कार्ल मार्क्सने लिहिलेले जगप्रसिद्ध ग्रंथ. |
| **रक्तरंजित रविवार** | सेंट पीटर्सबर्ग येथील राजवाड्यावर कामगारांनी नेलेल्या मोर्च्यावर झारच्या सैनिकांनी अमानुष गोळीबार केला. त्यात शेकडो लोक मारले गेले. ही घटना १९०५ साली रविवारच्या दिवशी घडली, म्हणून या घटनेला 'रक्तरंजित रविवार' असे म्हणतात. |
| **सेंट पीटर्सबर्ग येथील कामगारांचा उठाव** | ऑक्टोबर १९०५ मध्ये झालेल्या या उठावाने संपाच्या कार्यात सुसूत्रता यावी, कामगारांना योग्य मार्गदर्शन करावे यासाठी कामगार प्रतिनिधींनी एकत्र येऊन 'पीटर्सबर्ग सोविएत' ची स्थापना केली. |
| **ड्युमा** | म्हणजे रशियन संसद. तीन ड्युमा निवडल्या गेल्या. एकूण तीन ड्युमांपैकी पहिल्या दोन बरखास्त झाल्या आणि तिसरी ड्युमा झारच्या हातातील बाहुले बनली. |

## महत्वाची नावे

| | |
|---|---|
| **अलेक्झांडर पुश्किन दोस्तोवस्की, लिओ टॉलस्टॉय, मॅक्झिम गॉर्की** | १९ व्या शतकातील रशियन लेखक. यांनी आपल्या लेखनातून उदारमतवाद व मानवतावादाचा पुरस्कार केला. |
| **निहिलिस्ट** | रशियन विचारवंत ज्यांना सरकार, धर्म, विवाह, नीतितत्त्वे अशी बंधने सोडून बुद्धीवादावर आधारलेली समाजव्यवस्था हवी होती. |
| **कार्ल मार्क्स** | कार्ल मार्क्स हा जर्मन साम्यवादी विचारवंत होता.<br>'दास कॅपिटल' व 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' हे जगप्रसिद्ध ग्रंथ त्याने लिहिले. |
| **फ्रेडरिक एंजल्स** | फ्रेडरिक एंजल्स आणि कार्ल मार्क्स यांची संयुक्तपणे 'समाजवादाचा जाहीरनामा' ही प्रसिद्ध पुस्तिका १८४८ साली प्रकाशित झाली. |
| **फादर गेपॉन** | १९०५ मध्ये फादर गेपॉन यांच्या नेतृत्वाखाली झारविरोधी कामगार, सामान्य जनता व विचारवंत यांनी उठाव केले. |
| **निकोलस दुसरा** | सेंट पीटर्सबर्ग उठावाच्या वेळेस असलेला रशियाचा झार. |
| **झरीना अलेक्झांड्रा व रासपुतीन** | रशियाची राणी झरीना अलेक्झांड्रा हिचा निकटचा सल्लागार असलेला रासपुतीन हा सर्बियन मांत्रिक होता. |
| **केरेन्स्की** | झारच्या राज्यत्यागानंतर मेन्शेव्हिक गटातील केरेन्स्की याने हंगामी सरकारचे नेतृत्व केले. |
| **लेनिन** | एक महान क्रांतिकारक, जगातील पहिल्या साम्यवादी राज्याचा संस्थापक. |

## उजळणी तक्ता

### रशियन राज्यक्रांतीची कारणे

- रशियात क्रांतिकारी विचारांचा प्रसार
- रशियातील रोमॅनोव्ह घराण्यातील जुलमी राजवट
- रक्तरंजित रविवारची घटना
- सेंट पीटर्सबर्ग येथील कामगारांचा उठाव
- ड्युमाची बरखास्ती
- रासपुतीन प्रकरण

### रशियन राज्यक्रांतीचे महत्त्व

- कार्ल मार्क्सच्या तत्त्वांवर आधारित पहिली क्रांती.
- श्रमजीवी वर्गाला महत्त्वाचे स्थान प्राप्त.
- आर्थिक नियोजनाच्या मार्गाने विकास साधण्याची संकल्पना जगाला दिली.
- कल्याणकारी राज्य या कल्पनेचा जगभर स्वीकार.
- सर्व प्रकारच्या बंधनातून मुक्ती हा संदेश जगाला दिला गेला.
- रशियाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व वैज्ञानिक क्षेत्रांत आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले.
- साम्यवादावर आधारित नवीन सरकारयंत्रणा अस्तित्वात आली.
- पूर्वेकडील राष्ट्रांचे नेतृत्व रशियाने केले.
- समता, सहकार्य व विश्वबंधुत्वाचा आदर्श या क्रांतीने जगासमोर ठेवला.